**प्रेसनोट** दि. १/०७/२०२५

**अॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पुणे कार्यालयातील वरिष्ठ लिपीकावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५८ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. योगेश दत्तात्रय चवंडके, वय ३७ वर्ष, पद – लिपीक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पुणे. (वर्ग - ३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,०००/- (दोन हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | १,५००/- (एक हजार पाचशे ) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,५००/- (एक हजार पाचशे ) रुपये |
| पडताळणी दिनांक | २६/०६/२०२५ |
| सापळा दिनांक | ०१/०७/२०२५ |
| ठिकाण | नविन प्रशासकीय इमारत कार्यालयाचे आवारात असलेल्या चहाचे कॅन्टीन जवळ, कॅम्प, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रविण निंबाळकर , पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५५२५७४१४०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा सन २०२२ मध्ये मोटार अपघात झाला होता. परंतु त्यांच्या संबंधित विमा कंपनीने अपघाताची नुकसान भरपाई देण्यास मनाई केल्याच्या निर्णयाविरोधात त्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पुणे यांच्याकडे अपील केस दाखल केली होती. लोकसेवक योगेश चवंडके हे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये वरिष्ठ लिपिक म्हणून काम करत आहेत. नमूद केसच्या सुनावणी करीता मागील तारखेस तक्रारदार हे आयोगाच्या कार्यालयात हजर झाले असता त्यावेळी तक्रारदाराने दाखल केलेल्या केसची फाईल गहाळ झाली असून सापडत नाही असे लोकसेवक योगेश चवंडके यांनी तक्रारदारास सांगितले होते. त्यावर तक्रारदाराने लोकसेवक योगेश चवंडके यांचेकडे अधिक विचारले असता तक्रारदाराच्या केसची फाईल शोधून पटलावर ठेवण्यासाठी लोकसेवक योगेश चवंडके यानी तक्रारदाराकडे २००० रूपयाची लाच मागितल्याची तक्रार तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे २६/६/२०२५ रोजी दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २६/६/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक योगेश चवंडके, वरिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार यांची फाईल शोधून ठेवल्याचे सांगून त्या बदल्यात १,५०० रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. १/७/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक योगेश चवंडके यांनी तक्रारदाराकडून त्यांची फाईल शोधून ठेवल्याचे सांगून नविन प्रशासकीय इमारत कार्यालयाचे आवारात असलेल्या चहाचे कॅन्टीन जवळ तक्राराकडून १,५०० रुपये लाच रक्कम स्वीकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.